आपत्काळातील संजीवनी : स्वसंमोहन उपचार – खंड ४

# लैंगिक समस्यांवर स्वसंमोहन उपचार

मराठी (Marathi)


**संकलक**

**हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे**

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**भूतपूर्व संमोहन उपचारतज्ज्ञ (वर्ष १९७८ ते १९९४)**



## सनातन संस्था



**卐 सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या 卐**

मराठी ३४५, इंग्रजी २०१, कन्नड १९९, हिंदी १९६, गुजराती ६८, तेलुगु ५४, तमिळ ४४, बंगाली ३०, मल्ल्याळम् २४, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**ऑक्टोबर २०२४ पर्यंत ३६६ ग्रंथांच्या १३ भाषांत ९७ लाख ५९ सहस्र प्रती प्रसिद्ध !**

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचे हिंदु राष्ट्राच्या स्थापनेच्या संदर्भातील अद्वितीय कार्य !



१. धर्माधिष्ठित अशा हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष आणि कार्यारंभ (वर्ष १९९८)

२. हिंदु राष्ट्र, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर ग्रंथ-निर्मिती

३. हिंदूंना धर्मशिक्षण देणे, हिंदु धर्मरक्षण आणि हिंदु राष्ट्र-स्थापना यांविषयी हिंदूंचे प्रबोधन करणे, यांसाठी नियतकालिक ‘सनातन प्रभात’ मधून मार्गदर्शन

४. हिंदु राष्ट्राची छोटी प्रतिकृती असणाऱ्या सनातन आश्रमांची निर्मिती

५. साधनेचा संस्कार दृढ झालेले सहस्रो धर्मप्रसारक सिद्ध करणे

६. हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्वनिष्ठ, देशभक्त आणि सामाजिक कार्यकर्ते यांचे संघटन अन् त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन

७. भावी हिंदु राष्ट्राचे दायित्व सांभाळण्यासाठी पुढील पिढ्यांना सक्षम करणे

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।। – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

# अनुक्रमणिका

(प्रकरणांतील काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)


卐 मनोगत ७

**प्रकरण १ : लैंगिक समस्या** ९

**१. हस्तमैथूनासंदर्भात नियतकालिकांतील तथाकथित शास्त्रीय लेखांमुळे वाचकांचे होणारे अपसमज** ९

१ अ. वर्तमानपत्रात परस्परविरुद्ध माहिती देणारे लेख प्रसिद्ध झाल्यावर वाचकाच्या मनात हस्तमैथुनाविषयी संभ्रम निर्माण होणे ९

**२. शीघ्र वीर्यपतन** १३

**३. नपुंसकत्व** १४

३ अ. प्रकार १४

३ आ. उपचारांमुळे बरे झाल्याची उदाहरणे १५

**४. समसंभोगीपणा** ३४

४ अ. लक्षण ३४

४ आ. इतिहास ३५

४ इ. समसंभोगीपणाकडे बघण्याच्या समाजाच्या दृष्टीकोनात काळाबरोबर पालट पडत जाणे ३५

४ ई. समसंभोगीपणा हा विकार नव्हे, असे अमेरिकन तज्ञांनी ठरवणे ३५

४ उ. समाजातील समसंभोगी व्यक्तींचे प्रमाण ३६

४ ऊ. प्रकार ३६

४ ए. समसंभोगी व्यक्ती ३७

४ ऐ. कारणे ३८

४ ओ. संमोहन उपचार ४०

**५. अशा भोंदू वैद्यांपासून सावध रहा ! ५७**

५ अ. भोंदू लैंगिक समस्या तज्ञाकडून पैसे वसूल करणाऱ्या रुग्णाचे अभिनंदन ! ५७

**प्रकरण २ : सर्व समस्यांवरील कायमस्वरूपी उपाय : साधना ! ५८**

---

**टीप** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या उपाधीविषयीचे विवेचन !

थोर महर्षींनी सहस्रो वर्षांपूर्वी नाडीपट्ट्यांमध्ये भविष्य लिहून ठेवले आहे. या जीवनाडीपट्ट्यांच्या वाचनाच्या माध्यमातून महर्षी सनातन संस्थेला मार्गदर्शन करतात. १३.७.२०२२ पासून 'सप्तर्षी जीवनाडीपट्टी'च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना 'सच्चिदानंद परब्रह्म' ही उपाधी लावण्यात येत आहे. असे असले, तरी त्यापूर्वीच्या लिखाणात किंवा आताही साधक लिहून देत असलेल्या लिखाणात त्यांनी 'प.पू.' किंवा 'परात्पर गुरु' अशी उपाधी वापरली असेल, तर ती तशीच ठेवली आहे. F (DrV-Nav)

---

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या उत्तराधिकाऱ्यांच्या उपाध्यांविषयीचे विवेचन !

जीवनाडीपट्टी–वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ यांना 'श्रीसत्‌शक्ति' आणि सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांना 'श्रीचित्‌शक्ति' या उपाध्यांनी संबोधले जात आहे. त्यामुळे त्यापूर्वीच्या लिखाणात त्यांच्या नावाच्या आरंभी 'श्रीसत्‌शक्ति' किंवा 'श्रीचित्‌शक्ति' ही उपाधी लावलेली नाही. F (DrUtt + SStAG-Nav + SStBS-Nav)

## मनोगत

'स्वसंमोहन उपचार (४ खंड)' या उपमालिकेत विकाराच्या कारणानुसार नव्हे, तर लक्षणांनुसार 'तो विकार शारीरिक कि मानसिक आहे ?', याचा विचार केला आहे, उदा. बहुतेक लैंगिक समस्या मानसिक कारणांमुळे निर्माण होत असल्या, तरी त्या विकारांत शारीरिक लक्षणे आढळून येत असल्यामुळे ते विकार शारीरिक विकारांच्या गटात घेतले आहेत.

शारीरिक विकार प्रारंभिक टप्प्याचा असला, तर रुग्णाला स्वतःच स्वतःवर उपचार करता येतात. शारीरिक विकार पुढच्या टप्प्याचा असला, तर रुग्ण स्वतःच स्वतःवर उपचार करू शकत नाही. अशा वेळी अभ्यासू आणि तळमळ असलेली व्यक्ती संमोहन उपचारशास्त्राचा अभ्यास करून रुग्णावर उपचार करू शकते. उपचार करणे सुलभ जावे, यासाठी या ग्रंथमालिकेत विविध मानसिक आणि शारीरिक विकारांवर उपचार केल्याची उदाहरणे सविस्तर दिली आहेत. ती वाचून प्रत्यक्ष उपचार करण्यासंदर्भात दिशा मिळण्यास साहाय्य होईल.

### १. काही वर्षांपूर्वी विविध नियतकालिकांत यासंदर्भात लिहिलेल्या लेखांवर आधारित ग्रंथ संकलित करण्याचा उद्देश

१९८४ ते १९९० या काळात शारीरिक आणि मानसिक विकारांवर सह्याद्री, लोकप्रभा, सर्वज्ञानी, मुंबई सकाळ, गावकरी, सर्वज्ञानी आदी अनेक नियतकालिकांत आमच्या (डॉ. जयंत आठवले आणि डॉ. (सौ.) कुंदा आठवले यांच्या) प्रसिद्ध झालेल्या लेखमालांवर हा ग्रंथ आधारित आहे. १९९५ मध्ये मी 'संमोहन उपचारतज्ज्ञ' म्हणून रुग्णांवर उपचार करणे बंद करून साधना करू लागलो. त्यामुळे या ग्रंथात पूर्वीचे लेख घेतले आहेत. संमोहन उपचाराच्या पद्धती आणि त्यांचे परिणाम यांसंदर्भात नवीन पद्धती अजून उपलब्ध नाहीत; म्हणून जुनाच मजकूर घेतला आहे. साधनेच्या पद्धती जुन्या होत नाहीत, तसेच हे आहे.

## २. उदाहरणांची निवड

अ. 'रुग्ण उपचारासाठी ८ - १० वेळा आला अन् ४ - ५ मासांत बरा झाला', यासारख्या लेखातून वाचकांना शिकायला काहीच मिळत नाही. एक वर्षाहून अधिक काळ वा वैशिष्ट्यपूर्ण उपचार करावे लागले, तर त्यातून काहीतरी शिकायला मिळते. अशा उपचारांची माहिती या ग्रंथात घेतली आहे.

आ. काही रुग्णांना १० - १२ वर्षे व्याधी होत्या. 'संमोहन उपचाराद्वारे त्याही ठीक झाल्या, तर त्याहून अल्प कालावधीच्या आपल्या व्याधी निश्चितच ठीक होतील', अशी बहुसंख्य रुग्णांना निश्चिती मिळावी, हाही उद्देश कठीण रुग्णांच्या संदर्भात लेख लिहिण्यामागे होता.

## ३. पूर्ण ग्रंथमालिकेचा अभ्यास करा !

या ग्रंथात या शास्त्राचा वापर करून रुग्णावर किंवा स्वतःवर टप्प्याटप्प्याने उपचार कसे करायचे, उपचारातील चढ-उतार इत्यादी संदर्भात रुग्णांची उदाहरणे देऊन विषय स्पष्ट केला आहे. उपचाराविषयीची माहिती एखाद्या विकाराविषयी असली, तरी तिच्यात सांगितलेली सूत्रे कोणत्याही विकारासंदर्भात वापरता येतात. असे असल्यामुळे ज्या विकारावर आपल्याला उपचार करायचे आहेत, तेवढाच ग्रंथातील भाग वाचला, असे न करता पूर्ण ग्रंथाचाच नव्हे, तर या ग्रंथमालिकेतील सर्वच ग्रंथांचा अभ्यास करा. त्यामुळे उपचार करतांना आलेल्या अडचणीवर मात कशी करायची, हे लक्षात येईल.

रुग्णाचे मन शारीरिक किंवा मानसिक त्रासामुळे उपचारावर एकाग्र होऊ शकत नसल्यास त्याच्यावर किंवा त्याला स्वतःवर संमोहन उपचार करणे कठीण जाते. अशा वेळी 'आपत्कालीन ग्रंथमालिके'त दिलेले विविध उपचार करून त्रासाची तीव्रता न्यून केल्यावर संमोहन उपचार करणे शक्य होते.

या उपचार पद्धतीचा अभ्यास करण्याची बुद्धी बऱ्याच जणांना होवो, ही भगवान श्रीकृष्णाच्या चरणी प्रार्थना !'

**- (परात्पर गुरु) डॉ. जयंत आठवले (३.१.२०१४)**